आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या आस्थपनेवरील सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सन २०१९ मधील नियमित बदल्या

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन आदेश क्रमांकः सकआ - २०१९/प्र.क्र. १५७/ आस्था-२
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३१ मे, २०१९

शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या नियम-४ मधील तरतुदीनुसार समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम गट अ (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ९३००-३४८००, ग्रेड पे ५०००) संवर्गातील खालील अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात येत असुन, त्यांच्या नावासमोरील स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	सध्या कार्यरत ठिकाण	बदलीने पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३	४
१	श्री.जे. एम. चाचरकर	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, सिंधुदूर्ग	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, रत्नागिरी
२	श्री.बी. एन. देशमुख	संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, वर्धा	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, नागपूर
३	श्री.पी. जी. कुलकर्णी	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, चंद्रपूर	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, वर्धा
४	श्री.डी. बी. खरात,	संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद	सध्याच्या पदावर एक वर्ष मुदतवाढ देण्यात येत आहे
५	श्री.तेजस माळवदकर	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, परभणी	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, नांदेड
६	श्री.बी. ए. शिंदे	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, जालना	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, ठाणे
७	श्री.एम. टी. वानखेडे	सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, गोंदिया	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
८	श्री.जी. बी. वाकोडे	संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा

२. श्री.जे. एम. चाचरकर यांच्याकडे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, सिंधुदूर्ग या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे.

श्री.पी. जी. कुलकर्णी यांच्याकडे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, चंद्रपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे.

श्री.एस. जी. पेंदाम, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्याकडे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, गोंदिया या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे.

३. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे -

१. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यास बदली झालेल्या पदावर रुजु होण्यासाठी त्यांचेकडील कार्यभार परिच्छेद क्र.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे व अन्य प्रकरणी अन्या अधिकाऱ्यांकडे सोपवून तात्काळ कार्यमुक्त करावे.

२. बदली झालेला अधिकारी संबंधित कार्यालयातून कार्यमुक्त होऊन रुजू होण्यासाठी आल्यावर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखाद्या अधिकाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतीक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांस जबाबदार धरण्यात येईल.

३. बदली आदेशात बदल करुन घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे अधिकारी शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

४. प्रस्तुत शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५३११६१११३५९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.05.31 16:15:01 +05'30'

(अ.कों.आहिरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित अधिकारी (आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत)

प्रत,

१) आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
३) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
४) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण , संस्था पुणे
५) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
६) सर्व अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर

८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९) मा.मंत्री (सा.न्या. व वि.स.) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
१०) मा.राज्यमंत्री (सा.न्या. व वि.स.) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
११) मा.प्रधान सचिव (सा. न्या. व वि. स. विभाग) यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय मुंबई
१२) निवडनस्ती आस्था-२